सकाळ | शहर

# जमीन बिल्डरांच्या घशात

## नॅशनल पार्कमध्ये बांधकाम व्यावसायिकांचा दावा

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २१ : संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरात झोपडपट्ट्या, अतिक्रमण वाढत असल्याने वनक्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. अशातच दिंडोशी परिसरातील काही बांधकाम व्यावसायिकांनी येथील जमिनीवर आपला दावा सांगितला आहे. महापालिकेची यासाठी मंजुरी असल्याचे बांधकाम व्यावसायिकांचे म्हणणे आहे. याविरोधात वनशक्ती संस्थेने हरित लवादाकडे तक्रार केली आहे.

वनशक्ती संस्थेचे प्रमुख डी स्टॅलिन यांनी सांगितले की, दिंडोशी परिसरातील टेकड्या उद्यानाच्या बाहेरच्या कक्षात ठेवण्यात आल्या असून फक्त एक भाग 'ईएसझेड'हद्दीत समाविष्ट करण्यात आला आहे. याचाच फायदा उचलत पालिकेने अख्खा डोंगर बांधकाम व्यावसायिकांना आंदण दिला असून त्यावर टाउनशिपच्या बांधकाम योजना मंजूर केल्या आहेत. हे फारच धक्कादायक आहे. संपूर्ण डोंगराचा भाग भौगोलिकदृष्ट्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा भाग आहे. हे ओशिवरा आणि पोईसर या दोन नद्यांचे उगमस्थानदेखील आहे, मात्र या ठिकाणी बांधकाम व्यावसायिकांनी डोंगराचे खोदकाम करून नदीच्या पात्राचे सपाटीकरण सुरू केले आहे.

वन विभागाच्या दुर्लक्षामुळे हजारो झाडे तोडण्यात आली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बांधकाम व्यावसायिकांविरोधात दोन गुन्हेदेखील नोंदवले आहेत. तरीदेखील पालिकेने जमिनीवर विकास आराखडे मंजूर केल्याची माहिती स्टॅलिन यांनी दिली.

> सर्व प्रकरण पाहता हा मोठा भूखंड घोटाळा असल्याचे दिसते. कारण, संरक्षित वन्यजीव क्षेत्रातील अधिसूचित वनक्षेत्र केंद्र सरकार आणि वन्यजीव मंडळाच्या परवानगीशिवाय कोणालाही सुपूर्द करता येत नाही. राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीत जिल्हाधिकाऱ्यांना कोणतेही अधिकार क्षेत्र नाही. असे असताना ही परवानगी दिलीच कशी, म्हणून आम्ही सर्व संबंधितांना परवानगी मागे घेण्यासाठी आणि राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीत छेडछाड करण्यापासून परावृत्त करण्यासाठी कायदेशीर नोटीस पाठवली आहे. या बेकायदेशीर कृत्याला जिल्हाधिकारी आणि डीसीएफ एकत्रितपणे जबाबदार आहेत.
>
> **- डी स्टॅलिन,** वनशक्ती संस्था